# सवाशेर गहू - भाग २

शंकरने वर्षभर कडक तपश्चर्या केली. मुदतीच्या आधी सगळे कर्ज चुकवण्यासाठी त्याने व्रतच केले. आधीही दुपारची चूल पेटतच नव्हती, चण्या फुटाण्यावर गुजराण होत होती, तेही आता बंद झाले. फक्त मुलासाठी रात्री रोट्या शिल्लक ठेवल्या जायच्या. शंकर रोज एक पैशाचा तंबाखू प्यायचा. हे एकच व्यसन होते ज्याचा तो कधी त्याग करू शकला नव्हता. आता हे व्यसनही त्या कठीण व्रताला अर्पण झाले. त्याने चिलीम आपटली, हुक्का तोडून टाकला आणि तंबाखूच्या हंडीचा चक्काचूर केला. कपडे तर आधीच त्यागाच्या परिसीमेला पोचले होते. आता ते निसर्गाच्या किमान रेषांमध्ये सीमित झाले. शिशिराची हाडे गोठवणारी थंडी सुद्धा त्याने आगीप्रमाणे जळून पार केली. ह्या संकल्पाचे फळ आशेपेक्षाही जास्त मिळाले. वर्षाच्या शेवटी त्याच्याकडे ६० रु. जमा झाले.

त्याने विचार केला, पंडितजींना एवढे रुपये देईन आणि म्हणेन महाराज, बाकीचे रुपये थोड्याच दिवसांत आपल्यासमोर हजर करीन. आणखी १५ रुपये तर आहेत, पंडितजी इतकेही चालवून घेणार नाहीत का? त्याने पैसे घेतले आणि पंडितजींच्या चरणकामलांवर अर्पण केले. पंडितजींनी आश्चर्यचकित होऊन विचारले, कोणाकडून उधार घेतलेस का?
शंकर: नाही महाराज, आपल्या आशीर्वादाने चांगली मजुरी मिळाली.
विप्र: पण हे तर ६० रुपयेच आहेत.
शंकर: हो महाराज. आत्ता इतके घ्या, बाकीचे मी दोन - तीन महिन्यांत देतो. मला ऋणमुक्त करा.
विप्र: ऋणमुक्त तेव्हाच होशील जेव्हा माझी कवडी कवडी चुकवशील. जा आणि माझे आणखी १५ रुपये घेऊन ये.
शंकर: महाराज, थोडी दया करा. आता रात्रीच्या रोटीचा सुद्धा ठिकाणा नाहीये. गावातच आहे तर कधी ना कधी देईनच.
विप्र: मला हा रोग वाढवायचा नाहीये, ना मला जास्त बोलायचे आहे. माझे सगळे रुपये मिळाले नाहीत तर आजपासून शेकडा ३ रु व्याज लागेल. तुझे पैसे हवे तर स्वतःच्या घरात ठेव, हवे तर माझ्याकडे देऊन जा.
शंकर: ठीक आहे. जितके आणले आहेत तितके ठेवून घ्या. मी जातो. कुठूनतरी १५ रु. आणखी आणण्याचा प्रयत्न करतो.
शंकरने पूर्ण गाव पिंजून काढले, पण कोणीच रुपये दिले नाहीत, यासाठी नाही की त्याच्यावर विश्वास नव्हता, किंवा कोणाकडेही रुपये नव्हते. यासाठी की पंडितजींच्या शिकारीला स्पर्श करायची कोणाची हिम्मत नव्हती.
क्रियेस प्रतिक्रिया हा निसर्गाचा नियम आहे. वर्षभर तपश्चर्या करूनही जेव्हा शंकर ऋणमुक्त होऊ

शकला नाही तेव्हा त्याच्या संयमाचे रूपांतर निराशेमध्ये झाले. त्याने विचार केला, की जर इतके कष्ट करूनही वर्षभरात ६० रुपयांहून जास्त जमा करू शकला नाही तर आता असा कोणता उपाय आहे ज्याने दुप्पट रुपये जमा होतील? जर डोक्यावर कर्जाचे ओझच लादायचे आहे तर मणभराचे काय आणि सव्वा मणाचे काय? त्याचा उत्साह क्षीण झाला, मेहनतीबद्दल घृणा निर्माण झाली. आशा ही उत्साहाची जननी आहे. आशेमध्ये तेज आहे, शक्ती आहे, जीवन आहे. आशा हीच संसाराची चालक शक्ती आहे. शंकर निराशेने उदासीन झाला. त्या गरजा ज्यांना त्याने वर्षभर लांब ठेवले होते, आता दारावरच्या भिकारणी न राहता छाती वर स्वर होणाऱ्या पिशाचिणी झाल्या, ज्या त्यांना भेट मिळाल्याशिवाय सोडत नाहीत. कपड्यांना ठिगळ लावण्याची पण एक मर्यादा असते. आता शंकरला पैसे मिळाले की तो ते जमा न करता कधी कपडे तर कधी खाण्याची वस्तू आणायचा. जो आधी फक्त तंबाखूच प्यायचा, तो आता गांजा आणि चरस यांच्याही आहारी गेला. त्याला आता कर्ज चुकवण्याची काहीच चिंता नव्हती, जणू त्याच्यावर कोणाचा एक पैसाही कर्ज नव्हते. आधी जरा थोडा आळस करायचा, पण कामावर नक्की जायचा. आता कामावर न जाण्यासाठी बहाणे शोधायला लागला. अश्या रीतीने तीन वर्षे निघून गेली. विप्र महाराजांनी एकदाही तगादा लावला नाही. ते चतुर शिकाऱ्याप्रमाणे अचूक नेम साधणार होते. आधीपासून सावजाला सावध करणे त्यांच्या नीती च्या विरुद्ध होते. एक दिवस शंकरला बोलावून त्यांनी हिशोब दाखवला. जे ६० रु. जमा होते ते वजा करूनही शंकरच्या नावावर १२० रु. निघाले.

शंकर: इतके रुपये तर पुढच्या जन्मीच देईन, ह्या जन्मी नाही देऊ शकत.

विप्र: मी ह्याच जन्मी घेणार. मुद्दल नाही तर नाही, व्याज तर द्यावेच लागेल.

शंकर: एक बैल आहे, तो घ्या. आणखी माझ्याकडे आहेच काय!

विप्र: मला बैल-गाडी घेऊन काय करायचंय? तुझ्याकडे मला देण्यासाठी बरंच काही आहे.

शंकर: आणखी काय आहे महाराज?

विप्र: काही आहे, तू स्वतः तर आहेस! शेवटी तू कुठे तरी मजुरी करायला जातोसच ना! मलाही शेतीसाठी मजूर लागतातच. व्याजासाठी तू माझ्याकडे काम कर, जेव्हा जमेल तेव्हा मुद्दल परत कर. असे आहे की तू आता जोपर्यंत माझे रुपये चुकवत नाहीस तोपर्यंत दुसऱ्या ठिकाणी कामाला जाऊ शकत नाहीस. तुझ्याजवळ काही इस्टेट सुद्धा नाहीये, एवढी मोठी रक्कम कोणत्या विश्वासावर सोडू? तू मला महिन्या महिन्याला व्याज देशील ह्याची कोण जबाबदारी घेणार? आणि तू मला व्याजही देऊ शकत नाहीस तर मुद्दल कुठून देणार?

शंकर: व्याजासाठी मी काम केले तर खाऊ काय?

विप्र: तुझी घरवाली आहे, मुलगे आहेत, त्यांना काय हात पाय नाहीत? आणि मी तुला रोज अर्धा शेर जव देईन, पांघरायला वर्षाला एक कांबळ मिळेल आणि एक रजई सुद्धा बनवून देईन. आणखी काय हवंय? लोक तुला ६ आणे देतात हे खरे आहे, पण मला खरी गरज नाहीये, मी तर तुला रुपये भरून घेण्यासाठी ठेवतोय. शंकरने थोडा वेळ चिंताग्रस्त होऊन विचार केला आणि म्हणाला, महाराज, ही तर

जन्माची गुलामी झाली.
विप्र: गुलामी समज किंवा मजुरी समज. मी माझे पैसे चुकते केल्याशिवाय तुला कधीच सोडणार नाही. तू पळून गेलास तर तुझा मुलगा भरेल. हा, जर कोणीच राहिले नाही तर गोष्ट वेगळी.
ह्या निर्णयावर कुठेच अपील नव्हते. मजुराला जामीन कोण राहणार? कुठेच शरण नव्हते. पळून कुठे जाणार? दुसऱ्या दिवशी पासून त्याने विप्रजींच्या इथे काम करायला सुरुवात केली. सवा शेर गव्हांमुळे आयुष्यभराच्या गुलामीची बेडी पायात घालून घ्यावी लागली. त्या अभाग्याला आता ह्या विचाराने समाधान वाटायचे की हे माझ्या पूर्वजन्माच्या कर्माचे फळ आहे.
पत्नीला ती कामेही करावी लागत होती जी तिने कधीच केली नव्हती. मुले अन्नाला महाग झाली, पण शंकर गपचूप बघण्याशिवाय काही करू शकत नव्हता. ते गव्हाचे दाणे कोण्या देवाच्या शापाप्रमाणे त्याच्या डोक्यावरून कधीच उतरले नाहीत.

.

.

विप्रजींकडे २० वर्षे गुलामी केल्यानंतर शंकरने ह्या आसार संसारातून प्रस्थान केले. अजूनही ते १२० रु. त्याच्या डोक्यावर होतेच. पंडितजींनी त्या गरीबाला ईश्वराच्या दरबारात त्रास देणे योग्य मानले नाही, इतके अन्यायी, इतके निर्दय ते नव्हते. त्यांनी त्याच्या तरुण मुलाची मानगूट पकडली. तो अजूनही विप्रजींकडे काम करतोय. त्याचा उध्दार कधी होईल, होईल की नाही ईश्वरच जाणे.
वाचकहो! ह्या गोष्टीला कपोलकल्पित समजू नका. ही सत्य घटना आहे. अश्या शंकराची आणि अश्या विप्रांची जगात कमतरता नाहीये.

(पूर्ण)

**लेखक: मुन्शी प्रेमचंद**

**भाषांतर: डॉ मंजिरी मणेरीकर**

(ही कथा प्रेमचंद यांच्या '२१ अनमोल कथा' या पुस्तकातून घेतली आहे. Maple press private limited ह्या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक संपादित केले आहे. त्यांच्या परवानगीने मी ह्या कथेचे भाषांतर केले आहे.
This story is the translation of Munshi Premchand's story 'Sava Ser Gehun' from the book '२१ अनमोल कथा' published by Maple Press Private Limited. I have translated it with their permission.)